# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०६/२०२४ (शुक्रवार) सकाळ

---

### सुगंधीत तंबाखुजन्य पदार्थ व पान मसाला पदार्थाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर बुट्टीबोरी पोलीसांनी कारवाई करून एकूण १,२९,०२७८४/— रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक २७/०६/२०२४ चे रात्री पोउपनि मुन्नसिंग ठाकुर यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील स्टाफ वाय पॉईट येथे पेट्रोलिंग करीत असतांना स्टाफ यांना दुरूनच लाईटाचा उजेड दिसला. पोस्टे बुट्टीबोरी स्टाफ रोडचे कडेला गाडी थांबवुन ट्रक क्र. एच आर— ५५ ए.एल. ३५५२ च्या चालकाला नाव गाव विचारले असता त्याने अपले नाव एजाज वल्द समिर अहमद वय २६ वर्ष रा पर्वभिकाई सोनार पो रामबक्शगढ़ ता गौरा जामो जि. अमेठी उत्तरप्रदेश असे सांगीतले त्याला वाहणामध्ये काय आहे असे विचारले असता तो बरोबर सांगत नव्हता स्टाफला त्याचे बोलण्या वरूण संशय आल्याने त्याचा वाहणाची पाहणी केली असता त्याचे वाहणामध्ये सुगंधी गुटका चा वास येत होता सदर आरोपी चालक नामे —एजाज वल्द समिर अहमद वय २६ वर्ष रा पर्वभिकाई सोनार पो. रामबक्शगढ़ ता. गौरा जामो जि. अमेठी उत्तरप्रदेश हा ट्रक क्र. एच आर ५५ ए.एल ३५५२ च्या वाहनामध्ये खालील मुद्देमाल वाहतुक करतांनी आढळुन आला १) राज निवास पान मसाला पॉकेट प्लास्टीक पोते १८४ किं ८०,५४७८४ २) सेंटेड टोबोंको पॉकेट ३५ किंमती १८,४८०००/— असा एकून ९९०२७८४/— रू तसेच अशोक लेलॅन्ड कंपनीचा ट्रक ज्याची किंमती ३०,०००० असा एकुन १,२९,०२७८४/— रू चा माल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आलेला असुन आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे कलम ३२८, २७२, २७३, आणि अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६ (१) २६ (२)(iv) ३० (२) सह कलम ३(१) (अ) सहकलम ५९ सह महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना क्र. अ.सु.मा. अ/अधिसुचना ४९६/२०२३/७ दि १८/०७/२०२३ अधिनियम प्रमाणे गुन्हा नोद करून तपासात घेण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोनि हृदयनाराण यादव ठाणेदार पो. स्टे. बुटीबोरी, पोउपनी मुन्नासिंग ठाकुर, अंगरक्षक (काशिनाथ घुबडे) सफौ सुरेश घवराळ पोहवा रामराव आडे, अरविंद बव्हाण, पोलीस अंमलदार प्रविण खंडारे किष्णा राठोड नितेश राठोड यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मुन्नासिंग ठाकुर, पो.स्टे. बुटीबोरी हे करित आहे.

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. देवलापार** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे अप. क्र. ८१/२०१८ कलम ३७६(ड) भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात दि. २२/०३/२०१८ चे २०.०० वा. ते दि. २३/०३/२०१८ चे ००.३० वा. दरम्यान पिडीता ही गावी बाहेर संडासला गेली असता आरोपी नामे— अजय शिव ताकोत, वय २७ वर्ष, रा. पवनी ता. रामटेक जि. नागपूर मागुन आला व त्याने (फिर्यादी) पिडीतेचे तोंड दाबुन खेचत बेशरमचे झुडुपात नेले. तिचेशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस अधिकारी सुरेश मट्टामी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे—०८, श्रीमती एच. सी. शेंडे मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २८/०६/२०२४ रोजी मा. डी. जे—०८, श्रीमती एच. सी. शेंडे मॅडम यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३७६ भादवि मध्ये ०७ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/— रू. दंड. दंड न भरल्यास सहा महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा इमरान शेख यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**